पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६८**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २६/०३/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.२६/०३/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**

२. मा.कलाटे मयूर पांडुरंग

३. मा.कलाटे राहुल तानाजी

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक ०६/०५/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १६८**
(सभावृत्तांत)
( दिनांक २६/०३/२०२० ची तहकूब सभा )

**दिनांक – ०६/०५/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **२६/०३/२०२०** ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०२०** रोजी दु.**०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती** – सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने सदरची सभा बुधवार दिनांक **०८/०५/२०२०** रोजी दुपारी **२.१५** वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६८**

(सभावृत्तांत)

( दिनांक २६/०३/२०२० व ०६/०५/२०२० ची तहकूब सभा )

**दिनांक – ०८/०५/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०६/०५/२०२०** ची तहकूब सभा शुक्रवार दि.**०८/०५/२०२०** रोजी दु.**०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१४. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.निकम, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.चव्हाण, मा.गलबले, मा.मोरे – कार्यकारी अभियंता, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल - हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ७०२१ विषय क्रमांक – १

दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/२०३/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये रूग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेली अस्थायी स्वरूपातील २९ वरिष्ठ निवासी, ६३ कनिष्ठ निवासी, ५ वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ व ८ वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी, ९ वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु एम.ओ व २ वैद्यकिय अधिकारी बी.टी.ओ ही पदे एकत्रित मानधनावर तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपात सहा महिनेकरीता भरणेकामी वृत्तपत्रात व मनपा संकेत स्थळावर जाहिरात क्र.२६५ दि.०१/०२/२०२० चे प्रकटन प्रसिध्द करून अर्ज मागविणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने वरील पदासाठी आलेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची गुणवत्तेवर व आरक्षणानुसार निवड व प्रतिक्षायादी तयार करणेत आलेली आहे. त्यामधून प्रथम निवड झालेल्या १५ वरिष्ठ निवासी, ४१ कनिष्ठ निवासी, ५ सी.एम.ओ, ६ शिफ्ट ड्युटी, ६ आय.सी.ओएम.ओ व १ बी.टी.ओ उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/१७९/ २०२० दि.१८/०२/२०२० अन्वये नियुक्ती देणेत आलेली आहे. नियुक्ती आदेशात नमुद केलेल्या विहित मुदतीत १५ कनिष्ठ निवासी, १ सी.एम.ओ, २ शिफ्ट ड्युटी असे एकूण १८ उमेदवार रूजू झालेले नसल्याने व सदरचे रिक्त जागांची रूग्णालयास आवश्यकता असल्याने रिक्त जागा तातडीने भरणेकामी प्रतिक्षा यादीतील खालील तक्त्यातील उपलब्ध ३ कनिष्ठ निवासी, १ सी.एम.ओव १ शिफ्ट ड्युटी उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/२०२/२०२० दि.१२/०३/२०२० अन्वये नियुक्ती दिलेली आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवड प्रवर्ग | विभाग | पदनाम | एकूण मानधन प्रती महा. र.रू |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पुष्कर देवेंद्र चौधरी | खुला | सर्जरी | कनिष्ठ निवासी | ५५०००/- |
| २ | डॉ.जिवन राजेंद्र पळसकर | इ.मा.व | सर्जरी | कनिष्ठ निवासी | ५५०००/- |
| ३ | डॉ. प्राजक्ता प्रमोद जंगम | इ.मा.व | बालरोग | कनिष्ठ निवासी | ५५०००/- |
| ४ | डॉ. सचिन आण्णासाहेब पाटील | भ.ज.क | सी.एम.ओ | वैद्यकिय अधिकारी | ५५०००/- |
| ५ | डॉ. संदिप रामकिशन तुमवाड | अ.जमाती | शिफ्टड्युटी | वैद्यकिय अधिकारी | ५५०००/- |

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयास उपरोक्त पदांची आवश्यकता असल्याने प्रतिक्षा यादीतील उपलब्ध वरिल ५ उमेदवारांना आदेशाच्या तारखेपासून पुढे मुळ आदेशातील अंतिम दिनांक ०८/०९/२०२० पर्यंत तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणुक देणेत आलेली आहे. सदर उमेदवारांना प्रती महा देणेत येणा-या एकत्रित मानधन खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी व उक्त नेमणुक आदेशान्वये नियुक्ती केलेले उमेदवार विहित मुदतीत कामावर रूजू न झालेस किंवा रूजू झालेले उमेदवार मुदतीपुर्वी सोडून गेल्यास अशा रिक्त होणा-या तसेच वरिल जाहिरातीनुसार पुरेशा प्रमाणात उमेदवार उपलब्ध न झाल्याने शिल्लक राहिलेल्या उर्वरीत रिक्त जागी पुढील सहा महिन्याकरीता Walk In Interview ने नेमणुका करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०२२ विषय क्रमांक – २
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१/कावि/३६९/२०२०, दि.१३/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना विषाणूचे संसर्गामुळे उद्भवत असलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महापालिका स्तरावर वैद्यकिय विभागामार्फत उपाययोजना करणेत येत असून याकरीता वैद्यकिय अधिकारी व स्टाफ नर्स संवर्गातील अधिकारी व कर्मचा-यांची आवश्यकता भासणार आहे. सद्यस्थितीत उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थतीचा विचार करता नव्याने पदभरतीची प्रक्रिया राबविणेस विलंब लागणार लागू शकतो. त्यामुळे दि.०३ जानेवारी २०२०रोजीच्या मानधन भरती जाहिरातीमधील उपलब्ध असणा-या गुणानुक्रम यादीमधुन एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकिय अधिकारी (बीएएमएस) या संवर्गातील ०७ पदे व स्टाफ नर्स या संवर्गातील २४ पदे अशी एकुण ३१ वाढीव पदे उपलब्ध करुन घेऊन वैद्यकिय विभागांतर्गत असणा-या रुग्णालयांमध्ये यापूर्वी निश्चति केलेल्या अटी, शर्ती व मानधनावर नेमणेस व सदरच्या पदांना द्यावयाच्या मानधनाचे अदायगीकरीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०२३ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – म.सा.भां, वैद्यकिय
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभा/५/कावि/१४२/२०२०, दि.१५/०३/२०२०

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणुसंसर्गाचा धोका निर्माण झाला असून, सदर आजाराचा प्रादुर्भव रोखणे तसेचकोरोना आजारास अटकाव करणेकामी मनपामार्फत नवीन भोसरी रुग्णालयात कोरोनावॉर्डसाठी तातडीने कर्मचारी दैनंदिन साफसफाईच्या कामकाजाकरीता लागणारे आवश्यक ते मनुष्यबळ ४५ कर्मचारी व ४ सुपरवायझर उपलब्ध करून देणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना नवीन भोसरी रुग्णालयातील तयार करणेत आलेल्या कोरोना वॉर्डसाठी तातडीने २५ कर्मचारी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रथम आदेश देण्यात येवून तद्रंतर सध्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता त्यांचे समवेत करण्यात आलेल्या कारारनाम्यास अधिन राहून ४९ कर्मचा-यांकरीता किमान वेतन कायदयानुसार एकुण र.रु.१२,८८,६१४/- (अक्षरी र.रू.बारा लाख अठ्याऐंशी हजार सहाशे चौदा फक्त) प्रति महा प्रमाणे (सर्व खर्चा सहीत) मान्यता तसेच कोरोना वॉर्ड सुरु असेपर्यंत येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.अतिरिक्त आयुक्त यांची मागणी असली तरी कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता प्रस्तुत कामासाठी दरमहा र.रु.१२,८८,६१४/- या प्रमाणे तीन महिने कालावधीसाठी करारनामा करून काम करुन घेणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०२४ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – म.सा.भां, वैद्यकिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभा/८/कावि/४२/२०२०, दि.१४/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोनाच्या अटकावसाठी व कोरोनाच्या साथीचा सामना करण्यासाठी मनपाच्या जिजामाता रुग्णालय व अजमेरा येथील मनपा इमारती मध्ये 130 बेड चे कोरोनावार्ड तयार करणेकामी मे.कोठारी मेडीकल यांचेकडील प्राप्त लघुत्तम दर प्रती नग र.रू.9900/- प्रमाणे एकुण 130 hospital bed with matters and I.V ROD सह एकुण र.रु.12,87,000/- (अक्षरी र.रु.बारा लाख सत्याऐंशी हजार फक्त) मध्येथेट पध्दतीने खरेदी करणे कामीचे खर्चास मान्यता व मे कोठारी मेडीकल यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०२५ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/१३७/२०२०, दि.१८/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोनाच्या अटकावसाठी व कोरोनाच्या साथीचा सामना करण्यासाठी मनपाच्या आरोग्य विभागासाठी Mistblower SR 420 बनावटीचे औषध फवारणी मशिन मे.गुरुदत्त ॲग्रो एजन्सीज & सर्व्हिसेस यांचेकडील लघुत्तम दर प्रती नग र.रू.33,417/- प्रमाणे एकुण 24 नग मशिनसाठी एकुण र.रु.8,02,008/- (अक्षरी र.रु.आठ लाख दोन हजार आठ फक्त) थेट पध्दतीने खरेदी करणे कामीचे खर्चास मान्यता व मेगुरुदत्त ॲग्रो एजन्सीज&सर्व्हिसेस यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ७०२६ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०८/०५/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/४०३/२०२०, दि.१९/०३/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या वैद्यकिय विभागाने मागणी केलेनुसार कोरोना या संसर्गजन्य रोगाचा भारतामध्ये प्रसार होत असुन कोरोना विषाणूच्या आजाराचा प्रसार तसेच प्रतिबंधासाठी घ्यावयाची काळजी व करावयाच्या उपाय योजना याबाबत पिंपरीचिंचवड मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती / प्रबोधन होणेकामी १०० शेकडा पोस्टर्स तातडीने छपाई करुन घेणेकामी यापूर्वीचे निविदा मंजुर दरानुसार मे.विजय प्रिंटर, आकुर्डी यांचेकडून निविदा न मागवता, थेट पध्दतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसुची प्रकरण ५ (२)(२) छपाईकरुन घेणेकामी व सदर पोस्टर्स छपाई करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.१,४४,५००/- (अक्षरी र.रू.एक लाख चव्वेचाळीस हजार पाचशे फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/४९६/२०२०
दिनांक – ०८/०५/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाही